# प्रकरण दुसरे

## ‘झळ’ आणि ‘आग’ या कादंबऱ्यांचे आशयविशेष

# प्रकरण दुसरे

# 'झळ' आणि 'आग' या कादंबऱ्यांचे आशयविशेष

**प्रास्ताविक :**

बाबुराव गायकवाड यांचा जन्म महाराष्ट्रातील बीड जिल्ह्याच्या परळी (वैजनाथ) तालुक्यातील लाडझरी या गावी ९ ऑगस्ट, १९५४ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण घाटनांदूर येथील सोमेश्वर विद्यालयात, औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयातून बी.ए. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम.ए. ची पदवी प्राप्त केली. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून 'दलितेतर लेखकांच्या कथात्मक साहित्यातील दलितांचे चित्रण' हा विषय घेऊन पीएच.डी. पदवी प्राप्त केली. तर १९७७ ते १९८२ पर्यंत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड येथील केळकर महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर १९८५ पासून कर्नाटक विद्यापीठाच्या मराठी विभागात मराठीचे अध्यापन व संशोधन सुरु आहे. ते मराठी विषयाचे विद्यापीठातील ज्येष्ठ मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी एम.फिल. व पीएच.डी. साठी काम करीत आहेत.

डॉ. बाबुराव गायकवाड हे विविध वाङ्मयात लेखन करणारे साहित्यविश्वातील महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांनी आपल्या साहित्यातून चोखंदळ रसिक, संशोधक, सर्वांगीण अभ्यासक, परिवर्तनवादी जाणिवेचा सखोल चिंतक व आपल्या वैचारिकतेतून सामाजिक प्रदुषण नाहीसे करू पाहणारा विचारवंत ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये त्यांच्या लेखनात प्रतिबिंबीत झालेली आहेत. गायकवाड यांनी 'झळ' (१९८०) आणि 'आग' (१९९६) या कादंबऱ्या लिहून दलित कादंबरीविश्वामध्ये मोलाची भर घातली. 'झळ' या कादंबरीची बोलकी, हृदयस्पर्शी अशी कथा आहे. गरीब परिस्थिती असल्याने

एकेक दिवस उपाशी राहून कॉलेज शिक्षण घेणाऱ्या एका तरुणाची कथा या कादंबरीमध्ये दाखविली आहे. तर 'आग' या कादंबरीतून मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीमुळे झालेली आंदोलने वर्णिलेली आहेत. 'बाज'(१९८४) या कथासंग्रहातून आजही ग्रामीण भागातून दलितावर होत असलेल्या अन्याय, अत्याचाराचे वास्तव चित्रण केलेले आहे.

तर 'हुंदका' (१९८८), 'सारेकाही' (१९९४), व 'स्पंदन' (१९९८) हे काव्यसंग्रह लिहून काव्याच्या प्रांतात आपले स्थान निर्माण केले आहे. 'दृष्टिक्षेप' (१९८६), 'आकलन' (१९९२), 'साहित्यवेध' (२०००) हे समीक्षा ग्रंथ आहेत. 'अंबुज' (आत्मकथन) हे दलित साहित्यात भर घालणारे आहे. 'मराठी दलित कथा' (समीक्षा) 'आजचा माणूस', 'गरिबांचा वाली' (नाट्यानुवाद), 'तुका म्हणे आता', 'नव्या पिढीची दलित कविता' ही संपादने प्रसिद्धीच्या मार्गावर आहेत. अशा प्रकारे बाबुराव गायकवाड यांनी मराठी वाङ्‌मयात नावलौकीक प्राप्त केला आहे.

आता आपण त्यांच्या 'झळ' व 'आग' या कादंबरीच्या आशयांचा विचार करू त्यांच्या या कादंबरीच्या आशयविशेषाबरोबर या कादंबरीच्या आशयाला पडलेल्या मर्यादा यांचाही विचार करू. 'झळ' ही कादंबरी एका 'मातंग कुटुबाची' हृदयस्पर्शी कहाणी आहे. तर 'आग' ही कादंबरी दलितांच्या अस्मितेचा एकूण असलेल्या मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्न कवेत घेऊन त्यातून दलितांच्या जीवनचित्रणाचे त्यातील ताणतणाव, दलित मानसिकता व चिंतशीलता यांचा वेध घेणारी आहे.

**'झळ' कादंबरीचा आशय :**

'झळ' या कादंबरीचा नायक केंद्रिभूत पात्र होय. प्राप्त परिस्थिती व सभोवतालची विषम व्यवस्था व समाजात पैसा, वशिला, सगेसोयरे यांचे जवळचे असणारे हितसंबंधामुळे अस्वस्थ झालेला 'शेशू' या तरुणाच्या हताश अवस्थेच्या चित्रणातून या कादंबरीला प्रारंभ होतो. सामाजिक, आर्थिक विषयमतेचा परिपाक म्हणून

दलितांच्या वाट्याला आलेले दारिद्रय, समाजजीवनात पैसा व वशिला, सग्यासोयऱ्यांचे हितसंबंध इत्यादीमुळे दलित जीवनाला अनेक व्यथा, वेदनांची झळ पोहचलेली असते. त्यामुळे सुशिक्षित दलित तरुण उदरनिर्वाहाचे साधन म्हणून नोकरी शोधतात. पदरात पडणारे अपयश इत्यादी बाबीमुळे त्यांच्या वाट्याला येणाऱ्या या अस्वस्थतेवर मात करू पाहणारा मातंग समाजातील तरुण 'शेशू' आणि त्याच्या कुटुंबाच्या दु:खद जीवनाची कहाणी या कादंबरीत बाबुराव गायकवाड यांनी चित्रित केली आहे. ही कहाणी केवळ 'शेशू'च्या कुटुंबापुरती मर्यादित नाही तर ही संपूर्ण दलित जीवनाची व्यथा आहे.

'शेशू' ही या कादंबरीतील केंद्रिभूत व्यक्तिरेखा आहे. त्याच्या अस्वस्थतेच्या काळात मात्र त्यांच्या कुटुंबाच्या ढासळत्या अवस्थेत प्रेमाच्या अनुषंगाने का असेना पण जगल्याचा व परिवर्तनाचा आधार देणारी रुना ही तरुणी, शेशूची दलित जीवन बदलण्याची त्याच्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची तिची तळमळ असते.

'शेशू'च्या वडिलाचा, तुरुंगवास, त्याचे मृत्यूपर्यंत कष्ट करून जगणे, भुकेचा प्रश्न सोडवण्यासाठी घातलेल्या दरोड्यात बंदुकीची गोळी चुकून रुनाच्या वडिलांना लागते. शेशूच्या वडिलांना कैद, कैदेतून सोडवून आणण्यासाठी 'दिमाखे' या व्यक्तीपात्राने शेशूच्या आईवर अन्याय अत्याचार करणे, शेशूची आई रंभा व रुनाची आई जमुना या दोन्ही स्त्रिया संसाराला सारख्याच आहेत. परंतु दलित्वामुळे व अनामिक संकटामुळे त्या परपुरुषाच्या वासनेच्या शिकार बनतात. त्यामुळे शेशूचे वडील रुनाला खालच्या जातीची म्हणून संबोधतात. शेशूचा मोठा भाऊ बदफैली आईवर गोळी झाडतो. त्याची प्रेयशी ही पळून जाते, अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली शेशूची आजी, इत्यादी दोन मातंग कुटुंब्रातील माणसाच्या जीवनात येणारे निकडीचे प्रसंग या घटनाप्रसंगात त्यांचा बळी जाणे, शेशू आणि रुना यांच्या कुटुंबाची होणारी वाताहत पण याची जीवनाला झळ न पोहचू देता दोघेही बाकी सर्व गोष्टींचा त्याग करून दलित जीवनातील अंधश्रद्धा, परंपरा संपवून नव्या

रुपाने परिवर्तन जीवन जगण्यासाठी शेशू आणि रुना दोघे विवाहबद्ध होतात. असा कादंबरीचा आशय आहे.

**'झळ' कादंबरीचे सूत्र :**

'झळ' कादंबरीकार बाबुराव गायकवाड यांनी कादंबरीची सुरुवात 'Flash back' पद्धतीने केलेली आहे. पहिल्या दोन प्रकरणात शेशूच्या वाटचालीच्या विकासाचा व विचारांचा वृत्तांत मांडला आहे.

'शेशू' हा झळ कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. या पात्राभोवती समाजातील अनेक घटकांचा प्रभाव पडलेला दाखवून त्याच्यावर मात करून नायक कसा आपल्या यशापर्यंत जातो याचे विश्लेषण प्रत्येक पानापानावरून पहावयास मिळते.

शेशू बी.ए. पर्यंतचे शिक्षण घेत असताना अनेक ठिकाणी नोकरीसाठी अर्ज करून मुलाखती देऊन येत असतो. पण नोकरीची चक्रे ही वशिलेबाजी, पैसा या जोरावर भरली जात होती असे अनुभवास आल्यामुळे त्याला अस्वस्थ वाटायला लागते.

शेशूच्या घरची गरिबी असल्याने चार वर्षे तो घरी जाऊ शकला नाही. ग्रामीण भागात असणारी जातियता शहरात दिसत नाही. याचे समाधान शेशूला वाटत असते. अशाने त्याला खेड्यापेक्षा शहरात रहावेसे वाटते. अडाणी लोकांच्यातील अंधश्रद्धेमुळे भानामती, करणी, भूतबाधा, उच्चनीचपणा यांनी समाज बरबटून गेला असल्याचे दिसते.

रुना ही खालच्या पायरीची, मग तिच्याबरोबर शेशू कसा लग्न करणार ते आम्ही पाहू असे म्हटले जात होते. दुनिया बिघडली, शिकलेल्या पोरांना काही कमीजास्त कळत नाही असे जो तो म्हणत होता. परंतु बोलणाऱ्यांची तोंडे त्याला बंद करायची होती. भूत, चेटूक, जादूटोणा यांचे उगीच स्तोम माजवून जगणाऱ्यांचे वाभाडे काढण्याचे त्याची मनिषा

असते. नोकरी मिळो की न मिळो, परंतु समाजाला जेवढे सुधारता येईल तेवढे सुधारायचे असे त्याने निश्चित केलेले असते.

शेशूला कॉलेजच्या शिक्षणाने खरे जीवन काय असते ते शिकविले होते. कॉलेजच्या जीवनात त्याने कंटाळवाणेपणा विसरला होता. कॉलेजमध्ये असताना अनेक कार्यक्रमात तो सहभागी असायचा त्यामुळे त्याच्या पाठीमागे अनेक मुली लागल्या होत्या. परंतु रुनाला दिलेल्या वचनाला तो धक्का न लावता रुनाशी एकनिष्ठ राहतो. कॉलेज करीत असताना अनेक हाल सोसून शिक्षण पूर्ण करून सुट्टी पडल्यानंतर शेशू घरी जातो. पण घरी कोणीच नसते. अशावेळी अंजना आजी, वडील वारल्याची बातमी सांगते. या बातमीने 'शेशू'ची अवस्था एखादे झाड उन्मळून पडावे तशी होते. ज्यांच्या सुखाकरीता हे सर्व करायचे होते तेच मरण पावल्यामुळे शेशू हतबल होतो. आता कुणासाठी जगायचं ? हा प्रश्न त्याला पडतो. या ठिकाणी प्रकरण दुसरे संपलेले आहे. या दोन प्रकरणामधून लेखकाने शेशूचे विचार, आचार समजून घेतलेले आहेत. यावरून लेखकाने Flash back पद्धतीचा वापर केल्याचे दिसून येते.

बाबुराव गायकवाड यांनी प्रकरण तीनपासून कादंबरी उलगडून सांगण्यास सुरुवात केली आहे. लेखकाने कादंबरीची सुरुवात शिक्षणाच्या विचारातून केली. ग्रामीण भागातील मुलंही जनावरामागून कलागती करत फिरतात. उगऽऽऽऽ उग असा आवाज होऊन वेसकराची दवंडी दिली. 'पाच वर्षापर्यंतची मुलं मुली शाळेत घाला हो ऽऽ' अशी दवंडी ऐकून 'पोरं लिहायला-वाचायला शिकली पाहिजेत हो' जसे ओट्यावर बसलेली मंडळी बोलत होती. हे ऐकूण शेशूच्या वडिलांनी शेशूला छप्पराच्या आड्यात ठेवलेला पाटीचा तुकडा स्वच्छ करून दिला. यामधून शिक्षणाविषयीची आवड, आस्था दिसून येते. या अशा सहकार्यामुळे शेशू शिक्षण घेऊन वर्गात पहिला नंबर घेतो. पदवीपर्यंतचे

शिक्षण पूर्ण करतो. या सर्व चढ-उतारांचा वेध लेखकाने घेतला आहे. हे पहावयास मिळते.

या कादंबरीत शेशू हे मुख्य पात्र असून कादंबरीच्या पानापानावर याची असणारी शिक्षण, समाज या विषयीची तळमळ दाखवून आपण काही तरी समाजाचे देणे लागतो या वृत्तीने समाज परिवर्तन करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. 'शेशू' गरिबीवर मात करीत शिक्षण घेत असतो. अशा प्रसंगी रुनासारख्या मुलगीच्या प्रेमात पडतो. त्यामुळे त्याला दु:खाचे अनेक प्रसंग येतात. पण रुनाच्या प्रेमाने तो दु:खावर मात करीत पुढे जात असतो.

शेशू शिक्षण घेण्यासाठी खेड्यातून शहरात जातो. तेथील वातावरणात भारावून जातो. तेथे असणाऱ्या सुख-सुविधा, रस्ते, इमारती जातियतेचा नसलेला लवलेश यामुळे शेशूला खेड्यापेक्षा शहर बरे वाटते. अशा शहरात राहून शिक्षण पूर्ण करण्याचे तो निश्चित करतो. कॉलेजमधील अनेक कार्यक्रमात सहभागी होती व हुशार असल्याने कित्येक मुली त्याच्या पाठीमागे लागत होत्या. पण शेशू त्यांच्यावर न भाळता रुनाविषयी एकनिष्ठ राहतो. रुना व शेशू प्रेमामध्ये आणाभाका करून त्या तडीस नेताना दिसतात. शेशू हा गरिबीमुळे कित्येक वेळा उपाशीपोटी राहून शिक्षण घेतो. शिक्षण घेत असताना अनेकवेळा नोकरीकरीता मुलाखती देतो. तेथे त्याला अपयश येते. संस्थामध्ये पैसा, वशिलेबाजी चालते त्यामुळे त्याला राग येतो. पुढील जीवन कसे जगायचं हा मोठा प्रश्न येशूला पडल्याने तो रुनाला म्हणतो की, 'एवढं शिकूनही नोकरी मिळत नाही. आपण कशावर जगायचं ग रुना ?' आपले हात दणकट असताना विचार करण्याची काय गरज ? दोघांचे हात सरसर हालू लागले. म्हणजे कशाला काही कमी पडायचे नाही. हे रुनाने दिलेले उत्तर म्हणजे एक संदेशच आहे. यातून जगण्याची प्रेरणा मिळते. जीवनाचे मोठे तत्त्वज्ञानच आपल्या तोंडून रुना मांडताना दिसते.

शेशूचे वडील रुनाला खालच्या पायरीची म्हणून हिणवतात. त्यावेळी शेशूला वाटते की, पायऱ्या तरी कुठेच दितस नाहीत ? मग वडिलांनी रुना खालच्या पायरीची कसे म्हटले ? हा शेशूला पडलेला प्रश्न. भारत देशातील वर्णव्यवस्था जातीव्यवस्थेत घेऊन जाते हा विचार करायला लावणारा आहे. या व्यवस्थेला न मानता परंपरेला नाकारुन शेशू शेवटी रुनाला स्वीकारुन आपले पुढील आयुष्य जगण्यास सुरुवात करतो. या ठिकाणी या दोन्ही जीवांनी एकत्र येऊन स्वत:चे नवे विश्व निर्माण केलेले पहावयास मिळते.

या कादंबरीतील शेशूचे वडील व त्याची आई रंभा यांची संसार कथा आहे. हे दोन्ही सुखाने संसार करीत असतात. संसाराकरीता लागणारे कष्ट करून संसार पुढे नेत असतात. परंपरेने वडिलांना जातियतेची 'झळ' पोहोचली असल्याने घरामध्ये दारिद्रय पाचवीला पुजलेले असते. दुष्काळ पडला असता लोकांना काही कामे नसतात. माणसे भुकेने मरत असतात. अशावेळी सर्व दलित समाजातील लोक एकत्र येऊन विचार करून म्हणतात की, 'असेही मरणार तसेही मरणार', आपण श्रीमंताच्या घरी दरोडा घालायचे ठरवितात. त्यावेळी धोंडो दिमाख्याच्या घरी दरोडा घालायला शेशूचे वडील जातात. पण त्यांना पुर्ववैमनस्य आठवल्याने त्यांनी दिमाखेवर गोळी झाडली असता ती रुनाच्या वडिलांना म्हणजे आण्णाला जाऊन लागते. त्याचा आरोप होऊन शेशूच्या वडिलांना अटक झाल्याने शेशूच्या घरी उतरती कळा लागते. तो डाव साधून धोंडो दिमाखे रंभाला तुझ्या नवऱ्याला सोडवून आणतो म्हणून आमिष दाखवून लगट करतो. या अमिषाला रंभा बळी पडते आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करून घेते. वासनेच्या आहारी गेल्याने रंभा स्वत:च्या मुलीला मारायला कमी करीत नाही. सोमी पाणी पित असताना रंभाने तिला विहिरीत ढकलते. ती स्वत:च्या मुलीला केवळ दिमाखेच्या सांगण्यावरून चिमुकल्या सोमीचा ती जीव घेते. इतकी क्रुर स्त्री दाखविली आहे.

तुरुंगवास भोगून शेशूचे वडील घरी परत येतात. पण स्वत:ची बायको दुसऱ्याच्या आसऱ्याला असलेली पाहून त्याची तळपायाची आग मस्तकाला जाते. हे सर्व सहन न झाल्याने आपल्या उतार वयातही तालुक्याच्या ठिकाणी हमाली करायला येतात. एका गाडीच्या धडकेने त्यांचा मृत्यू होतो. असे हे शेशूचे वडील जन्मापासून ते मरेपर्यंत कष्ट करीत असतानाच मरण पावतात. असे दाखविले आहे. हे सर्व गरीब असल्याने त्यांच्या वाट्याला येते. रंभासारख्या बदफैली, समाज विघातक कृत्य करणाऱ्या स्त्रीमुळे शेशूचे घर उद्ध्वस्त होते. अशा या आईला 'आई तरी कसे म्हणावे ?' हा भाऊला पडलेला प्रश्न मनाला सुन्न करणारा आहे. रंभाही दुसऱ्या व्यक्तिबरोबर कुकर्म करताना दिसल्याने भाऊ तिच्यावर राग व्यक्त करतो आणि नको ते विचार त्याच्या मनता येतात. आईच्या सर्व घटना भाऊ वडिलांना सांगतो हे ऐकून वडील रंभाला लाथा, बुक्क्यानी मारतो. त्यापासून रंभा भाऊला शिव्या देते आणि सावत्र आईसारखे त्याला वागणूक देते. भाऊ अशा वागण्याने रागावून गाव सोडतो. दुसऱ्या गावी जाऊन कष्टाची कामे करून दिवस काढू लागतो.

भाऊच्या गावी मिलेटरी भरतीचे साहेब येऊन तेथील मुले भरती करून घेऊन जातात. त्यामध्ये भाऊ भरती होतो. भरती झाल्याने त्याला आनंद होतो. मिलेटरीत त्याच्या कर्तृत्वाने नायक बनतो. प्रत्येक व्यक्तिला आपल्या जन्म दिलेल्या मातीची ओढही असतेच. भाऊ ही त्याला अपवाद नाही. बरेच दिवसांनी घरी आल्याने गावात उमा या मित्राकडे जातो. त्याची बंदूक घेऊन शिकारीला जातो. शिकार करून आगल्याने जेवण करतात. उमाच्या बायकोने कालवनाने भरलेले मातीचे भांडे भाऊपुढे ठेवल्याने त्याला एकदम मारल्यासारखे होते. अजून बाट, शिवाशिवी गावची गेली नाही हे पाहून भाऊला दु:ख होते. अनेक वर्षापासून असलेली जातियता अजूनही गेली नसल्याने त्याला दु:ख होते. यातून जातियतेचे स्वरुप लेखकाने दाखवून दिले आहे.

भाऊ मिलेटरीत काम करताना बराकीतील कॅप्टन बरेवानी यांची मुलगी बेला व भाऊ कित्येक वेळा सहवासात होते. बरेवांनी, बेला व भाऊ अनेकवेळा सिनेमाला गेलेले असतात. त्याच्या घरी येणे-जाणे असते. अशा सहवासातूनच बेलाचे भाऊवर प्रेम बसते. भाऊचा सत्कार केल्यानंतर कॅप्टनच्या घरी आल्यावर त्याच्या तोंडात पानाचा विडा दिला हे पाहून कॅप्टनला या कृत्याचा राग येऊन बेलाचा पानउतारा करून ते म्हणतात की, अविचारी भाऊची लायकी काय ? असे अपशब्द वापरुन काळजावर घाव घालीत होते. याला तोंड देऊन बेला त्यांना सडेतोड प्रतिउत्तर देते. यावरून तिचे भाऊवर निस्सीम प्रेम असल्याचे दिसते. कॅप्टन बरेवानी स्वत: शांत भूमिका घेऊन बेलाला परवानगी देतात.

बेलाचा कॅप्टननी पानउतारा केल्याचे पाहून नम्रतापूर्वक भाऊ हात जोडून म्हणाला, सर ! मी जातो, मनाचे स्वातत्र्य हे मानसाचे खरे स्वातंत्र्य त्यावर बंधन घालणारे कोण ? सर्व मरावे परंतु माणसाचे मन मरू नये म्हणतात. मग मी बेलाच्या निष्पाप प्रेमाला मारणारा कोण ? अशी तत्त्वज्ञानाची भाषा बोलणारा, प्रेमाला महत्त्व देणारा, माणसाचे मन मारु न देणारा भाऊ या ठिकाणी दिसतो.

बेला ही भाऊला गावी नेण्याकरीता हट्ट धरते. या दोघांच्या प्रेमामध्ये आणाभाका घेऊन सुख-दु:खात साथ देण्याचे वचन देते. पण ज्यावेळी भाऊ आईवर गोळी घालतो. हे पाहून बेलाला दु:ख होते. यामुळे वाट मिळेल तिकडे ती पळत सुटते. त्यावेळी भाऊ बेलाला थांबविण्याकरीता तिच्या मागे थांब म्हणून लागतो. पण बेला न थांबता ट्रकमधून जाते. असा हा भाऊ आईच्या मायेला पोरका झालेला असतो. त्यानंतरही बेला गेल्यामुळे तो पोरकाच राहिलेला पहावयास मिळतो.

भाऊ व बेला तिचे वडील कॅप्टन बरेवानी हे अनेकवेळा एकत्रित सिनेमाला जातात. कॅप्टन बरेवानी आपल्या मुलीचा स्वभाव पाहून, तिचे भाऊवरील प्रेम पाहून

परवानगी देतात त्यांनी मुली विषयीची मोठी स्वप्ने बघितलेली असतात. कॅप्टनला बेला समजून सांगताना तत्त्वज्ञानाची भाषा बोलते. बेलाला विरोध करण्यासाठी भाऊविषयी जातीचा प्रश्न टाकतात. त्यावेळी बेला म्हणते, 'तुम्ही असेच जातीला चिकटून बसणार का ?' तेव्हा कॅप्टन म्हणतात, 'बेला, व्यवहारात व जगात वागणे यात फार मोठा फरक असतो' असे समजून सांगत असतात.

'झळ' कांदबरीतील जमुना या स्त्रीपात्राचा स्वाभिमानी म्हणून उल्लेख करावा लागेल. आण्णा व जमुना आपला संसार सुखाने करीत असतात. जमुना ही रुनाची आई आहे. रुनाला खालच्या पायरीची म्हटले जायचे. कारण जमुना ही गंगाची मुलगी आहे. गंगावर जालीम नावाच्या पाटलाच्या मुलाने अत्याचार केला त्यातून जमुनाचा जन्म झाला. गंगा ही उदरनिर्वाहाकरीता तमाशात काम करते.

तत्कालीन काळात समाजात तमाशा या कलेला कमी लेखले जायचे. त्यामुळे जमुनाच्या पोटी जन्मलेल्या रुनाला खालच्या जातीची म्हणून हिणवले जायचे. अशा जमुनाला ऐन तारुण्यात वैधव्य येते. पण त्याची खंत न करता अनेक कष्ट करून रुनासारख्या मुलीला ती वाढवित शिक्षण देत असते. आपल्या मुलीवर बारकाईने लक्ष ठेऊन रुनाला मायेच्या प्रेमाने वाढवत स्वाभिमानी विचाराने वाटचाल करीत असते. रुना व शेशूच्या प्रेमाला आपली सहमती देऊन त्यांना आशीर्वाद देते व ती म्हणते की, ''शेशू मृग नक्षत्र सुरु झाले आहे. मृगाच्या पहिल्या पावसाच्या धारा पडत आहेत. तुला लागलेली झळ आता नक्कीच कमी होईल''[१] असे म्हणून तत्त्वज्ञानाची भाषा वापरताना पहावयास मिळते.

'झळ' कादंबरीत धोंडू दिमाखे जालीम व देविदास ही पात्रे सवर्ण असल्याने यांच्या जवळ पैसा, शेती आहे. याचा विनियोग कसा केला आहे याचे प्रत्यंतर या कादंबरीत येते. धोंडो दिमाखे हे पात्र रंभासारख्या गरीब दलित स्त्रीला अमिष दाखवून

आपलेसे करतो. रंभासारख्या स्त्रीचा पती तुरुंगात असतो. याचा फायदा घेऊन त्याला सोडवून आणतो म्हणून तिच्याशी लगट करत असताना दिसतो. तसेच दिमाखेची शेती असल्याने शेतीत काही पिकेल ते घेऊन जा म्हणून सांगतो त्यावेळी तिच्या एकांतवासाचा फायदा घेतो. सोमीसारख्या निष्पाप मुलीचा अडसर होतो. म्हणून रंभाला सांगून सोमीला मारायला लावतो. अशी व्यक्तिरेखा दाखविली आहे. दिमाखे स्वत:च्या पत्नीकडे देखील पाहत नसून दुसऱ्या स्त्रीच्या आहारी गेल्याचे दिसते. समाजातील विकृत स्वरुपाच्या व्यक्ती दाखवून लेखकाने त्याच्यावर प्रकाश टाकल्याचे दिसून येते.

जालीम ह्या पाटलाच्या मोठ्या मुलासारख्या व्यक्ती आपल्या सवर्ण जातीचा फायदा घेऊन गंगाची भिजलेली साडी स्वत:च्या अंगावर पडते. त्यामुळे मला बाट झाल्याचे दाखवून गंगा हे सर्व तुझे कृत्य गावात सांगून तुमच्या मायलेकीची धींड काढायला लावणार अशी भीती दाखवून तिच्यावर अत्याचार करून तिला उध्वस्त करतो. या अन्यायातून गंगाला जमुनासारखी मुलगी होते. तिला जगविण्यासाठी गंगा तमाशात काम करते. अशी गंगाच्या जीवनाची ससेहोलपट झाल्याचे लेखकाने मांडून तिची दयनीय अवस्था दाखविली आहे. जालीम सारख्या व्यक्ती जातीचा एकटेपणाचा फायदा घेऊन कसा अन्याय करतात हे दाखविले आहे.

देविदास हा पाटलाचा मुलगा रुना बरोबर शाळेत असतो. देविदासच्या मनात रुनाविषयी घर केले असल्याने रुना आपल्या कचाट्यात कधी सापडेल याची वाट पहात असतो. एके दिवशी रुना शाळेला जाते. त्यावेळी तिची मैत्रिण आलेली नसते. त्यामुळे रुना रस्त्याने एकटीच जात असते. तेव्हा रस्त्यावर पुस्तक पडलेले दिसते. ते पुस्तक रुना उचलून नाव वाचते तर ते पुस्तक देविदासचे असते. पुस्तक देण्यासाठी रुना भरभर जाते. पण ते पुस्तक स्वत:हून देविदासने टाकले असल्याने तो येत असताना रुनाला दिसतो. सापडलेले पुस्तक रुना त्याला परत करते. पण त्या पुस्तकातील पाच रुपयाची नोट तु

घेतलीस असा खोटा आरोप करून रुनाचे दप्तर पाहतो. त्यावेळी तिच्या पदराला धरण्याची जबरदस्ती करतेवेळी रुनाची एक चापट त्याच्या गालावर बसते. याचा विचार न करता रुनावर त्याने अन्याय केला.

शिक्षण घेत असताना देखील सवर्णाची मुले दलित असणाऱ्या मुलींकडे किती वाईट नजरेने पाहतात याचा एक नमुनाच देविदास या पात्राच्या माध्यमातून लेखक गायकवाड यांनी दाखविला आहे.

अंजना सारखे स्त्रीपात्र रंगवून समाजातील अंधश्रद्धा, भूतबाधा, करणी यासारखे प्रकार दाखवून लक्ष वेधले आहे. अंजना ही आंबाबाईचा जोगवा मागत असते. जोगवा मागतअसताना गप्पा गोष्टी करीत असते. अंजना आजी सारखी दैववादी स्त्री दाखवून लेखकाने याचे मूळ परंपरावादी विचाराचे असल्याचे दाखविले आहे. जर ही अंजना आजी शिक्षण घेतली असती तर ती जोगवा मागत फिरली नसती. त्यामुळे समाजातील स्त्रियांनी शिक्षण घेऊन आपली उन्नती करायला हवी असेच लेखकाने दाखविण्याचे कार्य केले आहे असे वाटते. अशा पात्राच्या माध्यमातून लेखकाने समाजातील चांगल्या वाईट गोष्टींचा आढावा या कादबरीतून घेतला आहे.

## 'झळ' मधील विशेष :

एखाद्या साहित्यप्रकारातील विशेष मांडणे इतके सोपे नसते. कारण त्यासाठी त्या साहित्य प्रकारातील बारकावे माहित असणे आवश्यक असते. साहित्य समाजाला काही तरी देऊ शकते. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात दिसत असते. यासाठी साहित्यकृती व्यवस्थित मांडणे आवश्यक असते. दलित लेखक शोषणाचा भूतकाळ आठवून अस्वस्थ होतात. स्वातत्र्यानंतरही त्या शोषितांच्या जीवनात परीवर्तन झालेले नाही. मुलभूत गरजापासून त्याला वंचित रहावे लागले. दारिद्रयाशी, अन्यायाशी झगडत रहावे लागले. त्यामुळे त्यांच्या मनात शोषितांच्या विरूद्ध चीड उत्पन्न होणे साहजिकच आहे

आणि ही चीड, संताप दलित लेखक आपल्या साहित्यातून व्यक्त करणे कर्तव्य समजतो. तसेच साहित्य हा समाजाचा आरसा आहे या उक्तीतून झाली असे वाटते.

बाबुराव गायकवाड यांनी आपल्या 'झळ' या कादंबरीतून शोषितांच्या आयुष्याचे चित्रण केलेले आहे. दलित साहित्यामध्ये लेखकाने आपले मोलाचे योगदान या कादंबरीच्या माध्यमातून दिले आहे. 'झळ' कादंबरीचे विशेष सांगत असताना अनेक मर्यादा पडतात. कारण या कादंबरीचे कथानक सरळ न मांडता त्यांने Flash back पद्धतीचा वापर केल्याचे दिसते. त्यामुळे या कादंबरीचे इतर कादंबरीपेक्षा वेगळे रुप दाखविण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

या कादंबरीची सुरुवातच कथा नायकाच्या दु:खाने दाखवून लेखक त्या पात्राच्या दु:खातून सुखाकडे वाटचाल दाखवितो. त्याला अनेक अडचणी येऊन देखील डगमगत न बसता त्यावर त्याने मात केल्याचे पहिल्या दोन प्रकरणात दाखविलेले आहे. या सुरुवातीच्या दोन प्रकरणामध्ये कादंबरीचे स्वरुप थोडक्यात सांगितले आहे. बाबुराव गायकवाड यांच्या 'झळ' या कादंबरीचे महत्त्वाचे विशेष म्हणजे दारिद्रय, दु:ख, दैन्य अत्याचारानी ग्रासलेल्या माणसांची कथा यात मांडलेली आहे.

परंपरेने चालत आलेल्या वर्णव्यवस्थेमध्ये भरडल्या गेलेल्या उपेक्षित मांग जातीमुळे शेशू सारख्या मुलाची झालेली शोकांतिका या कादंबरीत मांडली आहे. घरची गरिबी, दारिद्रय असल्याने शिक्षण घेण्यासाठी केलेली धडपड या कादंबरीत दाखविली आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेमुळे जातियतेत भरडल्या गेलेल्या मांग जातीची दु:खद घटना शेशूचे बाबा रुपाने दाखविली आहे.

'झळ' कादंबरीत भुकेचा प्रश्नही हाताळलेला आहे. दुष्काळ पडल्याने दलित लोकांना काम नसल्याने उपासपोटी राहून दिवस काढावे लागतात. त्यामुळे असेही मरतोय तसेही मरतो मग आपण दरोडा घालून भुकेचा प्रश्न मिटविण्याचा प्रयत्न ते कसे करतात.

याचे वर्णन या कादंबरीत मांडले आहे. भुकेपोटी माणूस कोणतीही गोष्ट करू शकतो. याचे हे एक उदाहरण म्हणता येईल.

दलिताअंतर्गत भेदभाव असतात या घटनेवरही प्रकाश टाकला आहे. म्हणून शेशूचे वडील शेशूला म्हणतात, 'रांडीच्या खालच्या जातीच्या पेरीबरोबर खेळू नकोस' म्हणून सांगतात. सवर्ण व्यक्ती दलित माणसांवर कशा प्रकारे अन्याय करतात हे धोंडो दिमाखे, जालीम आणि देविदास या पात्रांच्या माध्यमातून दाखविले आहे. धोंडो दिमाखे रंभासारख्या दलित स्त्रीला अमिष दाखवून कसा अन्याय करतो याचे वर्णन केलेले आहे. यातून सवर्ण लोकांची प्रवृत्ती पहावयास मिळते.'

जालीम सारख्या व्यक्ती जातीचा दबाव टाकून कसा अन्याय करतात हेही दिसते. तर देविदास सारख्या मुलाने ही शाळेत दलित मुलीकडे वक्रदृष्टी ठेऊन त्यांच्या एकटेपणाचा कसा फायदा घेतात हे दाखविले आहे. दलित समाजात शिक्षणाच्या अभावामुळे त्या समाजात अंधश्रद्धा, भूतबाधा, करणी यांचे प्राबल्य कसे पहावयास मिळते याचे प्रत्यंतर अंजना आजीच्या माध्यमातून लेखकाने मांडले आहे.

रुना मुलगी असूनही आठवड्यातील दोन दिवस काही तरी काम करून शिक्षण घेते. यावरून एक मुलगी असून शिक्षणासाठी केलेली धडपड पहावयास मिळते. जमुना ही रुनाची आई स्वत:चा पती ऐन तारुण्यात मरण पावलेला असून खंत न बाळगता काबाडकष्ट करून आपले आयुष्य जगत असते. यामधून कष्ट करण्याची इच्छा व त्यातून सुखाकडे कशी वाटचाल करावयाची हे दाखवून दिले आहे.

रंभा या स्त्रीपात्रातून समाजातील बदफैली अवस्थेचे चित्रण केले आहे. हा समाज बिघडविणाऱ्या रंभा सारख्या अनेक स्त्रीया असू शकतात. अशा समाज विघातक कृत्य करणाऱ्या प्रवृत्ती समाजातून समूळ नष्ट कराव्यात हे उद्दिष्ट ही स्त्रीपात्रे रंगविण्यामागे आहे.

अशी प्रवृत्ती जर नष्ट केली तर समाजाच्या विचारांची उंची वाढेल. असे लेखकाला दाखवायचे आहे असे वाटते.

बेलासारख्या स्त्रीपात्रातून निस्सिम प्रेमाचे रुप दाखविले आहे. बेलाचे वडील कॅप्टन बरेवानी हे मिलेटरी अधिकारी आहेत पण ते भाऊसारख्या मुलाला बेला स्वीकारणार असल्याचे समजताच कॅप्टन बरेवांनी भडकून बेलाला म्हणतात, ''भाऊ आपल्या लायकीचा नाही'' त्याची जात देखील काढतात. अशावेळी बेला म्हणते, ''पण तुम्ही असे जातीत चिकटून बसणार का ? आम्ही तुमच्याकडून कोणता आदर्श घ्यायचा ?'' असे रोखठोक उत्तर वडिलांना देते. यावरून ती किती पुरोगामी विचाराची, जातियतेच्याबाहेर जाऊन विधायक विचार करणारी आहे हे पहावयास मिळते. बेला हे सर्व फक्त माणूस ही एकमेव दृष्टी ठेऊन वडिलांना पटवून देऊन त्यांचा विचार बदलून होकारार्थी उत्तर मिळविण्यात यश मिळविते. अशी ही बेला भाऊला स्वीकारते. अशी दुसरी एक प्रेमकथा लेखकाने दाखवून सुधारीत विचार पुढे आणण्याचे कार्य केले आहे.

भाऊसारख्या मुलाने रंभासारख्या कुकृत्य करणाऱ्या स्त्रीला जर माफ केले तर सर्व स्त्रिया बिघडतील असे भाऊला वाटते. येथे भाऊची व्यक्तिरेखा एक पुरुष म्हणून व्यवस्थित साकार झालेली आहे असे वाटते. स्वतःच्या घरातील स्त्रीचे हे अश्लील चाळे बघून ज्याला चीड येत नाही, तो पुरुष कसला ? असे लेखकाला सांगावयाचे आहे. कांदबरीच्या शेवटच्या टप्प्यात रंभेला गोळी घालून ठार मारतो. इथं भाऊ या मुलाची व्यक्तिरेखा व्यवस्थित साकार झाली आहे असे वाटते. स्वतःच्या मुलादेखत धष्टपुष्ट नवऱ्यादेखत स्वतःचा देह परपुरुषाला देण्यासारखी लाजीरवाणी गोष्ट ती कोणती ? असे भाऊला राहून राहून वाटते. भाऊ हा प्रथमपासून ते शेवटपर्यंत पोरकाच राहतो. इतका स्वाभिमानी लेखकाने भाऊला दाखविला आहे.

शेशू परीक्षा संपवून घरी येतो. घराची अवकळा पाहून फार दु:खी बनतो. वडील मृत्यू पावल्याची खंत मनाला होते. त्यावेळी रुनाला शेशू म्हणतो, 'आता मी कुणासाठी जगायचे ? रुना त्याला म्हणते, ''माझ्यासाठी जग.....! याप्रसंगी शेशू रुनाला म्हणतो, इतके शिक्षण घेऊनही नोकरी नाही आता आपण कशावर जगायचे ?''[२] या ठिकाणी रुना त्याला स्पष्ट उत्तर देताना ती म्हणते, ''आपले हात दणकट असताना विचार करण्याची काय गरज ? 'दोघांचे हात सरसर हालू लागले म्हणजे कशाला काही कमी पडायचे नाही''[३] यामधून लेखकाने रुनाच्या बोलण्यातून श्रमाचा संदेश दिला आहे.

शेशू व रुना यांनी लाखो वर्षापासून चालत आलेल्या खालच्या वरच्या पायरीला आम्ही जपणार नाही. हीच एक आमची एकजूट आहे. आमच्या मागून येणारी बालके पूर्व परंपरा सोडून चांगले वागतील, असा आशावाद लेखकाने ठेवल्याचे दिसून येते.

आतापर्यंतच्या दु:खाची झळ कमी करण्यासाठी, समाजातील कठोर रुढींना तोंड देऊन समाजातील रुढी परंपरा तोडण्यासाठी शेशूने रुनाला जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन स्वीकारले आहे. हा पुरोगामी विचार नव्या पिढीला सल्ला देणारा आहे असे वाटते.

## 'आग' कांदबरीचे आशयविशेष :

### प्रास्ताविक

'आग' ही बाबुराव गायकवाड यांची 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर' चळवळीवर आधारीत कादंबरी आहे. 'झळ' या कादंबरीनंतर जवळजवळ पंधरा वर्षानी 'आग' ही कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरीत नामांतर चळवळीच्या पार्श्वभूमीवर दलित व दलितेतरामध्ये निर्माण झालेल्या तणावाचे व परस्पर संबंधाचे चित्रण लेखकाने डोसळपणाने व संवेदनशील प्रकृतीने केलेले आहे.

'मधू' या कांदबरीचा नायक शिक्षणासाठी शहरात जातो. तेथे तो नवीन विचाराने भारावून जाऊन धावडीला येतो. त्यावेळी त्याला अनेक प्रश्न पडतात. आपला समाज दरिद्री कसा राहिला. महारवाडा, मांगवाडा व चांभारवाडा या तिन्ही वाड्यात स्वत:च्या मालकीची शेती कशी नाही. दुसऱ्या समाजातील माणसांनी हातपाय न हालवताही पिढ्यानपिढ्या जगण्याची सोय कशी करून ठेवली असे अनेक प्रश्न मधुला भेडसावत असतात.

गाव सुधारण्यासाठी सामाजिक परिवर्तनाची जाण ठेऊन आपल्या समाजातील विचार बदलण्याचा तो प्रयत्न करीत असतो. चावडीमध्ये बाबासाहेबांची जयंती साजरी करण्यासाठी व सरुवर झालेल्या अन्यायाचा बदला घेण्यासाठी आलेला मधू हे न करता तसाच निघून जातो याचे वर्णन या कादंबरीत आले आहे.

## 'आग'मधील आशय :

'आग' ही बाबुराव गायकवाड यांची दुसरी कादंबरी आहे. या कादंबरीत लेखकाने मधू या पात्राच्या माध्यमातून ही कांदबरी उलगडून दाखविली आहे. मधू हा उमापूरला शिक्षणासाठी गेला असता तेथील कॉलेजात मिळालेल्या विचारधारेमुळे त्याच्यात आपल्या गावाविषयी अनेक प्रश्न सतावतात. आपला समाज सगळीकडून कसा दरिद्री राहिला. जमिनीविषयी असे अनेक प्रश्न पडतात. पोथी-पुराण-पंचांग सांगण याप्रकारे बारा महिने पूजा-पाठ करून दक्षिणा उकळणारा ब्राह्मण म्हणजे खंडणी वसूल करणारा जुलमी बादशाहा मधू कॉलेजात गेल्यापासून गरीब-श्रीमंत, धर्म-अधर्म, भारतीय समाजातील विषमता इ. विषयावरील व्याख्याने ऐकून त्याच्यात बदल झाला होता.

या कादंबरीत महत्त्वाचा भाग म्हणजे 'मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे म्हणून दलित लोक लढत होते. प्रत्येकजण कसली तरी 'अस्मिता' जपण्याचा प्रयत्न करीत होता. आणि त्या अस्मितेपोटी कित्येक माणसांचा

बळी जात होता. सगळा मराठवाडा जणू रणांगण बनला होता. या प्रश्नावर मधू व दौंड सर यांच्यात संभाषण होते. नामांतर प्रश्नावर तोडगा काढण्याकरीता दोन्हीकडील लोकांचे सामंजस्य घडवून आणणे हाच एक तोडगा आहे असे दौंड सर म्हणतात. ते म्हणतात की, डिग्रीवर एका महाराचे नाव येते. तेही एका जगदवंदनीय अशा प्रकांड विद्वानाचे नाव येते. म्हणून विद्यापीठाला नाव द्यावयाचे नाकारला तर माणसांना कसे काय आपलेसे करणार असा हा समतावादी विचार व्यक्त करताना दिसतात. माणुसकी व मानवता हाच देवधर्म असे म्हणणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे दौंडसर होय. असे पात्र रंगवून सवर्णामधील काही लोक समानतेच्या दृष्टीने विचार मांडताना दिसतात.

कासारसरांच्या सारखे लेखकाने विनोदी पात्र रंगवून चांगले मार्गदर्शन केलेले पहावयास मिळते. जातियतेच्या अन्यायापासून लांब जायचे असेल तर 'खेडे सोडून शहराकडे जावा' असा संदेश कासार सर देतात. दलित दलितातील जातीमध्ये अंतर्गत भेदभाव असतात हा प्रश्न या कांदबरीत मांडला आहे. महारवाडा व मांगवाड्याच्या मध्यभागी महारांनी सरकारी पैशाने आड खणला होता. त्याला पाणीही मुबलक होतं. आड महारांचा म्हणून कोणताच मांग पाणी अजून पीत नव्हता. अशा पाण्याच्या माध्यमातून दलित जातीमध्येदेखील अंतर्गत तेढ असलेली पहावयास मिळते.

काकतकरसारख्या व्यक्तीच्या माध्यमातून आपल्याच माणसांच्या डोळ्यात धूळ फेकायला कशी सुरुवात केली होती, हे दिसून येते. काकतकर बी.ए.ला एक-दोनदा वचका बसल्यामुळे वैतागून त्याला क्रांतीच्या कचेरीत कारकूनी करीत असे. काकतकर आपल्या गावची अमूक सुधारणा करतो. तमूक करतो असे म्हणून आपल्याच समाजातील गरीब माणसांना लुबाडीत होता. त्याने अनेक उद्योग केले आहेत. कुणाच्या मुलामुलींची लग्ने लावून देतो, नोकरी लावून देतो, म्हणून त्याने कित्येकांचे पैसे घशात घातले होते. शे.का. चे वसतिगृह चालविण्यासाठी घेतले असताना तेथेही त्याने व्यवस्थापकाला खोटे

हिशोब ठेवायला सांगून घरात पैसा ओढण्याचा सपाटा चालविला होता. सवर्णांना तर 'मुहंमे राम और बगल में छुरी' या परंपरेने बहालच केली होती. पण 'जयभीम बोलो कुछभी कर लो' अशी वृत्ती दलित पुढाऱ्यांची झाली होती. काकतकरला हरहुन्नरी स्वभावाचा दाखवून समाजातील घातक प्रवृत्ती दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. राजकारणाचे डावपेच ओळखून सुशिक्षित दलितांना योग्य मार्गदर्शन करणारे कासारसरांच्या सारखी माणसे कमी आहेत. हे तर लेखकाला सांगायचे नाही ना ? असे वाटते.

सरु सारखे स्त्री पात्र रंगवून दलित समाजात सरुसारख्या सुंदर मुली असतात. तसेच सरु व मधूच्या प्रेमाचे फक्त वर्णन लेखकाने केले आहे. पण त्याला कुठेही जवळ आल्याचे दाखवून दिले नाही. त्यांचे प्रेम हे अबोलावस्थेतच राहिलेले दाखविले आहे. अशा या सुंदर मुलीवर सवर्ण लोक डोळा ठेऊन त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेतात. अशा या सरुवर चंदा पाटील अन्याय करतो. त्यामुळे ती बरबाद होते. असे वर्णन या कादंबरीत आले आहे. सरुच्या आईच्या पात्राच्या माध्यमातून लेखकाने साधीभोळी माणसं एखाद्या गोष्टीवर लगेच कसा विश्वास ठेवतात. सरु कुठेतरी नोकरी करेल व नंतर लग्नही जमेल ही अशा ठेऊन सरुची आई सरुला काकतकर यांच्या बरोबर पाठवून देते.

दलित समाजातील माणसं भुकेपोटी काय करू शकतात याच्याकडे लेखकाने प्रकाश टाकला आहे. धाबडीला दोन वर्षापासून पाऊस अपुरा पडत होता. महार-मांगाची माणसं आंब्याच्या कोया भाजून किंवा उकडून खाऊन येणारा दिवस घालवत होती. चारापाण्यामुळे जनावरे पटापट मरत होती. भुकेपोटी महार-मांगांची माणसे व लेकरे मृतमांस खांडावर तुटून पडत होती.

मधू व बन्सी यांनी तर सवर्णाच्या मुलांना शिऊन त्यांची भाकरी बाटवून स्वत:चे पोट भरतात. असा हा भुकेचा प्रश्न लेखकाने मांडला आहे. बन्सी हा शिकला सवरलेला

मुलगा असल्याने त्याला नोकरी लागते. पण तरीही बन्सी जनावरे ओढण्याचे काम करतो याची चीड मधुला येते. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गावकीची कामे करू नका असे म्हटले असताना देखील ही शिकलेली माणसं अशी कामे करतात. याचे दुःख मधुला होते. बन्सी सारखी माणसे डॉ. आंबेडकरांच्या विचारांची प्रतारणा करत आहेत हेच या पात्रामधून दाखविले आहे. चंदा पाटील सारख्या व्यक्ती आपल्या संपत्तीचा, जातीचा उपयोग एखाद्या व्यक्तीवर दबाव आणून कसे अन्याय करतात. याचा नमुना म्हणजे हे पात्र होय.

चंदू वारके, त्याचे आई-वडील यांच्या रुपाने आणखी एक बलुतेदारातील कुटुंब दाखविले आहे. त्यांना मधूविषयी आस्था, आपुलकी, जिव्हाळा वाटतो म्हणून त्यांनी मधुला धोका असतो त्यावेळी दडवून खोलीत ठेवतात. यावरून त्यांच्या मनात असलेली दलित लोकांच्याविषयीची सहानुभूती पहावयास मिळते. म्हणून त्यांनी मधुला पूर्व सूचना दिलेली आहे या कुटुंबाच्या माध्यमातून बाबुराव गायकवाड यांनी दलितांच्या बद्दल इतर समाजात आस्था दाखविली आहे.

मधूमध्ये उमापूर कॉलेजमधील व्याख्यानाचा परिणाम होऊन तो धावडीला येतो. तेथील अनेक प्रश्न त्याला सतावत असतात. कॉलेजमधून येत असताना समाजाला डॉ. बाबासाहेबांचे विचार सांगून बदलण्याचा त्याचा मानस असतो. त्या दृष्टीने तो अनेक प्रयत्न करता त्यातच सित्याबापू माली पाटलाच्या धाकट्या पोराने मारले म्हणून मधूकडे येतो. याचा विचार करण्यासाठी आपल्या समाजातील बैठक घेऊन काय ते ठरवं असे सित्याबापू म्हणतो. ही संधी ओळखून मधूने बोलायला सुरुवात केली व तो म्हणाला, 'सरकारने आपल्याला अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे त्यांचं पित्त खवळतयं,' सगळीकडं असचं सुरु आहे. मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव

देण्यावरून किती दंगली झाल्या हे सांगत मधूने संघटनेचा विचार व्यक्त केला. त्याला सर्वांनी होकार दिला.

आपल्या तीन वाड्यापुरती पंचायत बनवू. मनाने व विचाराने पटकन एकत्र येतील अशीच मंडळी या पंचायतीत घेऊ. जुन्या माणसांनी आता नव्यांना जरा पुढं येऊ द्याव. असे म्हटल्यानंतर सर्व लोकांनी मान्यता दिली. ही सभा घेतली म्हणून अण्णासाहेब पाटील यांनी मधुला विचारताना म्हणाले, 'तू चोरांचा लिडर व्हता म्हण की ? त्यात तू शिकून बी त्येंचा साक्षीदार बनतूस का ? ' त्यामुळे मधुला खूप राग आला. तू असल्या फंदात पडू नकोस असे पाटील बजावतात.

धावडीतील दलित लोक पाण्याच्या टंचाईमुळे ग्राम पंचायतीकडे अर्ज करतात. तो अर्ज सरपंचाकडे देतात याचा राग सवर्ण व्यक्तींना येतो. तो सरपंचाच्या हातातील अर्ज पाटील घेऊन वाचण्यास सुरुवात करतात. त्या अर्जातील अर्थाचा बेअर्थ करतात. अशा या गावच्या पाटलाच्या रुपाने आपल्या अधिकाराचा गैरवापर करून कसा अन्याय करतात हे दाखविले आहे. या सवर्ण व्यक्ती पदावर असून दलित माणसाला समानतेची वागणूक देत नाहीत.

दलित व्यक्तींनी पाण्यासाठी अर्ज केला म्हणून धावडीच्या दलित लोकांना सवर्ण लोक शेतात कामावर घेत नाहीत. दुकानातील बाजार द्यावयाचा नाही असे जाहीर करतात आणि जर या नियमाचे कोणी उल्लंघन केले तर दंड ठेवण्यात येतो. अशा प्रकारे सवर्ण लोक अन्याय करतात हे लेखकाने दाखवून दिले आहे. मधू उमापूरला कॉलेजमध्ये शिकत असताना मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ सुरु होती. त्यावेळी कॉलेजमध्ये अनेक संघटना चळवळीला मदत करीत होत्या. त्याचवेळीमधू देखील आपली मातंगाची संघटना स्थापन करून चळवळीचे काम करतो. त्याच्या कॅलेजचे

प्राचार्य संघटना काढणाऱ्या मधुला म्हणतात, ''तुला डफडी वाजवता येते का ? हेकटपणा चालवू नको.''[४] असे उत्तर दिले जाते.

आम्ही सर्वजण खातो-पितो-शिकतो एका ठिकाणी, पण काही श्रेयाच्यावेळी मात्र मांगा -चांभाराची मुले डवलली जातात अशी खंत मधू बोलून दाखवितो. असे अनेक प्रश्न उपस्थित करून ग्रामीण व दलित जीवनाचे चित्रण करीत पुढे जाणारी 'आग' ही कादंबरी दलित तरुणांच्या मानसिकतेचे, ग्रामीण भागातील दलित जीवनाचे व प्रवृत्तींचे चित्रण या कादंबरीत मांडले आहे. सामाजिक जीवनातील दलित-दलितेत्तर समाजाचे वास्तवचित्रण बाबुराव गायकवाड यांनी समर्थपणे केले आहे. दलित कादंबरीच्या इतिहास गायकवाड यांची 'आग' ही कादंबरी आशयाच्या पातळीवर वेगळे रुप घेऊन येते.

## 'आग' कादंबरीचे सूत्र :

बाबुराव गायकवाड यांची 'आग' ही दुसरी कादंबरी. दलित कादंबरीमध्ये 'आग' ही कादंबरी आपल्या कलागुणाने व मांडणीच्या दृष्टीने निराळेपण घेऊन येताना दिसते. मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळीच्या पार्श्वभूमीवर दलित व दलितेतरांमध्ये निर्माण झालेल्या तणावांचे व परस्पर संबंधाचे चित्रण लेखकाने तटस्थपणे मांडलेले आहे. असे मला वाटते.

कादंबरीची सुरुवात ही एस.टी. बसच्या धावण्याने झालेली आहे. मधू हा आपल्या धावडी गावाकडे येत असतो. त्यावेळी एस.टी. तील वातावरण लेखकाने उभे केले आहे. मधू बसमधून येत असताना दादा काय करत असतील ? वंसत सासरवाडीतच असेल का ? सरुने एस.एस.सी. ची परीक्षा दिली असेल का ? बसमध्येही काळोख व बाहेरही काळोख त्याच्या मनात अशा अनेक प्रश्नांचा काळोख पसरला होता.

मधू गावात येतो त्यावेळी लुळाण्णा भेटून त्याच्याकडील बॅग घेऊन चालायला लागतो. घराकडे जाताना अनेक लोक वाटेत भेटत असतात. सवर्ण लोक मात्र त्याच्याकडे वाकड्या नजरेने पाहत असतात. धावडी गावची रचना पाणंदीच्या वरच्या बाजूला सवर्णांची व खालच्या बाजूला महार व मांगाची घरे होती. गावाला तटबंदी नसली, तरी पाणंदीने गावकुस मजबूत केला होता. महारवाडा आणि मांगवाडा यात अर्ध्या फर्लांगाचे अंतर होते. होलेरवाडा व चांभारवाडा धावडीच्या दक्षिणेस सुमारे अर्ध्या फर्लांगावर होता. महारांची वीस, मांगांची दहा-बारा तर होलार व चांभारांची मिळून दहा घरे होती. पाचशे घराच्या धावडीतही दलितांचे असे सवते सुभे होते. अशी ही धावडी गावची रचना असलेली पहावयास मिळते.

उमापूर, कॉलेजमध्ये मधूवर अनेक व्याख्यानाचा प्रभाव पडून त्याच्या डोक्यात आपल्या गावाविषयी अनेक प्रश्न घोळत असतात. आपल्या दलित वस्तीतील लोकांच्याकडे जमीन का नाही ? पण दुसऱ्या समाजातील माणसांची तर हातपाय न हालवताही पिढ्यानपिढ्या जगण्याची सोय करून ठेवली ? भारतीय समाजव्यवस्थेची उतरंड कुण्या बिनबुडाच्या मनूने लिहिलेली होती. असे अनेक प्रश्न त्याच्या मनात घर करून उभे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित झालेला मधू आंबेडकर जयंती साजरी करण्यासाठी व सरुवर झालेल्या. अन्यायाचा बदला घेण्यासाठी गावाकडे येतो. आपला समाज अनेक वर्षापासून गरीब, हलाकीचे जीवन जगतो आहे याची जाणीव होऊन तो समाज परिवर्तनाची सुरुवात करतो. समाजातील मुलांनी शिक्षण घेऊन स्वत:मध्ये बदल करायला पाहिजे असे त्याला वाटत असते. शिक्षणाच्या बाबतीत वसंत याने परिश्रम घेऊन मुलांना शाळेत घातल्याने मधू खूष होतो. दलित समाजातील माणसांना उन्हाळ्यात पाण्याची टंचाई होते. म्हणून मधू समाजातील लोकांच्या सह्या

घेऊन धावडी ग्रामपंचायतीकडे पाण्याची सोय व्हावी म्हणून अर्ज करतो. सरकारकडून उद्योगाकरीता कर्ज मिळते तसेच सरकार घरासाठी पैसे देतयं यासाठी मधू प्रयत्न करून समाजात सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. समाजातील सर्वांना एकत्र जमवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याचे निश्चित करून त्या दृष्टीने अनेक प्रयत्न करतो.

उमापूर कॉलेजला असताना चळवळीत भाग घेतो. त्याने मातंग फेडरेशनची स्थापना केलेली असते. मधू कॉलेजच्या प्राचार्यांकडे पावती फाडायला गेल्यांनतर ते मधूचा पानउतार करतात, "तुम्हाला चांगली डफडी वाजवता येतात का ?"[५] अशा उपरोधपूर्ण बोलण्याचा मधुला राग येतो. पण तो आपले कार्य सतत चालू ठेवतो. कॉलेजमध्ये असताना आपल्या इतर संघटनात मातंगांना कुठे प्रतिनिधीत्व मिळाले आहे ? 'आम्ही सर्वजण खातो-पितो-शिकतो एका ठिकाणी, पण काही श्रेयाच्यावेळी मात्र मांगा-चांभारांची मुले डावलली जातात याची खंत मधुला वारंवार वाटत असते. कॉलेजमध्ये प्रा. दौंडसर व प्रा. कासारसर या दोन व्यक्ती मधुला त्याच्यातील असणाऱ्या समतावादी दृष्टीमुळे आवडत असतात. कासारसरांचे मार्गदर्शन तो घेत असे. चंदू वारकेच्या घरी गेल्यानंतर चंदूच्या आईला पाहिल्याने त्याला आपल्या आईची आठवण येते व तो रडू लागतो. यावेळी स्वत:ला आई नसल्याची खंत त्याच्या मनात सलत असते.

काकतकरासारखी माणसं बाबासाहेबांचे नाव घेऊन आपल्याच माणसांना लुबाडत होती. अशा लोकांचा मधुला राग येत असे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला आत्मभान देऊन जागृत केले. दलित व्यक्तिला माणुसकीची जाणीव करून दिली. दलित लोकांची स्वत:विषयी अस्मिता असते. ती जपण्यासाठी गावकीची कामे नाकारण्यास सांगितले. पण आपल्या समाजातील काही व्यक्ती शिक्षण घेऊन देखील

सुधारल्या नाहीत. याकरीता बाबुराव गायकवाड यानी बन्सीसारख्या पात्राद्वारे काही लोक गावकीची कामे करतात असे दाखविले आहे. बन्सी जनावरे ओढण्याचे काम करतो म्हणून मधुला त्याचा राग येतो. असा मधू आंबेडकरांच्या विचाराने भारावलेला दिसतो. यावरून त्याच्यातील आंबेडकरी विचाराचा प्रभाव पहावयास मिळतो. समाज परिवर्तनाचे कार्य करत असताना सरुसारखी मुलगी मधूच्या प्रेमात पडतअसते. पण लेखकाने त्यांचे प्रेम अबोल ठेवले आहे. सरुवर चंदा पाटलाने अन्याय केला हे समजल्यावर त्याचा बदला घेण्यासाठी मधू आपल्या गावी धावडीला येतो. मधू हा सरुवर प्रेम करीत असतो. त्यामुळेच तो पाटलाचा बदला घेण्यासाठी येतो असे वाटते.'

सरु स्त्री पात्र म्हणून कादंबरीत येते. सरु ही दिसण्यास सुंदर असते. अशा सरुवर मधू प्रेम करीत असतो. सरु मधुला म्हणते, मला कधी होस्टेलला घेऊन जाणार ज्यावेळी तू एस.एस.सी. परीक्षा पास होशील त्यावेळी तुला घेऊन जाईन म्हणून वचन दिलेले असते. चंदा पाटील सरुवर अन्याय करताना ती विरोध करते, त्याचा चावा घेते. पण काही उपयोग होत नाही. अशा नराधमाने एका सुंदर मुलगीला आयुष्यातून उठवले. हे सर्व सरु पत्राने मधुला कळविते. त्यामुळे तो दु:खी होतो. याचा बदला घेण्यासाठी धावडीला येतो. पण तेथे सरु परगावी काकतकरा बरोबर गेली असल्याचे समजल्याने तो फार दु:खी होतो आणि सरुच्या आईला म्हणतो. मावशी तिला काकतकरांबरोबर कशाला पाठविलीस म्हणून दु:ख व्यक्त करतो. सरुची आई म्हणते, काकतकराने नोकरी लावतो व तेथील एखाद्या मुलाला दाखवून लग्न ही लावून देतो असे म्हणून काकतकराने घेऊन गेल्याचे सांगते. या पात्राच्या माध्यमातून स्त्री एखाद्या व्यक्तीवर किती विश्वास टाकते हे दिसून येते. त्याचबरोबर सरुची आई किती साधी भोळी आहे हे पहावयास मिळते.

सरुला असे पाठवून दिल्यानेच तिच्या जीवनाची वाताहात झालेली आहे. काकतकरांने एका स्त्रीकडे सरुला ठेवली असताना ती स्त्री म्हणते काकतकर माझा कुणी

नाही. स्वत:ला सोडवून घेण्याविषयी सरु विनवनी करते. अशाप्रसंगी ती स्त्री म्हणते तुला दोन महिने पोसलेला खर्च दे आणि मग निघून जा. सरुला एका पुरुषाच्या हवाली करून दुकानाचे साहित्य आणते म्हणून ती स्त्री बाहेर पडते. अशा तऱ्हेने सरुच्या जगण्याची वाताहत झाल्याचे पाहवयास मिळते. या सर्व घटना मधुला पत्रानेच कळतात. वरील घटनेला काकतकरच जबाबदार आहे याची खात्री होऊन काकतकराविषयी त्याच्या मनात राग येत असतो.

वसंता हा मधुचा जीवलग मित्र असतो तो त्याच्याच जातीतील असतो. वसंतला मधूने जास्त शिक्षण घेतले असल्याने त्याचा त्याला अभिमान वाटत असतो. समाजात बदल करीत असताना मधूच्या विचाराला साथ देत असतो. मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे म्हणून वसंत घरोघरी जाऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून देवून मुलांना शिक्षण घेण्याकरीता पाठवितो. यावरून त्याच्यातील शिक्षणविषयीची आस्था दिसते. दलित समाजातील स्त्रियांच्यावर वाकडी नजर ठेवणारा व सरुवर अन्याय केलेल्या चंदा पाटलाला मारण्याच्या कटात वसंताने सहभाग घेऊन चंपाला सूत जुळविण्यास सांगून पाटलाला बुकलून काढण्यात वसंत पुढे असतो. असा वंसत अनेक ठिकाणी मधुला मदत करताना दिसतो.

मनोहर चवरे हा मधूचा कॉलेजमधील मित्र. मधू बरोबर चळवळीतही सहभागी होतो. मनोहर हा कॉलेजमध्ये एकमेकांच्या खोड्या काढत असतो. एकदा कासारसर तास घेत असताना तास सुरु व्हायच्या सुरुवातीला मनोहर कासारसरांना शंका विचारतो. सर तुमच्या डोक्यावर केस का नाहीत ? असे खोडकर प्रश्न विचारतो. याची परिस्थिती गरिबीची आहे. म्हणून तो कॉलेज करीत 'पार्ट टाईम' काम करीत असतो. 'पार्ट टाईम' काम करून तो पैशाची उधळपट्टी न करता स्वत:च्या शिक्षणाबरोबर आपल्या बहिणीच्या शिक्षणाचा खर्च पाहत असतो. स्वत:ची चर्मकार संघटना न काढता चळवळीमध्ये सक्रीय होण्याचा विचारही व्यक्त करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती झाली की नाही हे

मधुला पत्राने विचारण्यास विसरत नाही. असा हा मनोहर चवरे मधूच्या सुख दु:खात सहभागी होत असतो.

उमापूरच्या कॉलेजला असताना दौंडसर मधुला प्राध्यापक म्हणून होते. दौंडसरांचा व मधूचा एन.एस.एस. मुळे अनेक वेळा संपर्क येत असतो. दौंड सर सवर्ण असून त्यांचा कुठेही सवर्णाचा ताठा दिसत नाही. सरांच्या घरी अनेक नेत्यांचे फोटो होते. पण देव्हारा नव्हता याचे विशेष मधुला वाटते. मराठवाडा विद्यापीठात नामांतराचा लढा सुरु होता. याच्या बद्दल दौंडसर व मधू यांच्यात चर्चा करतात. डिग्रीवर एका महाराचे नाव येते. म्हणून विद्यापीठाला नाव देण्याचे नाकारतात. तर माणसांना कसे काय आपलेसे करणार ? या प्रश्नातून दौंडसरांचा दलित माणसांकडे विधायक दृष्टीने पहाण्याचा प्रयत्न दिसतो. 'माणुसकी' व 'मानवता' हाच देव आणि धर्म ते मानत असतात.

प्रा. कासारसर हे मधूचे आवडते शिक्षक असतात. त्यांचा स्वभाव विनोदी, खेळकर वृत्तीचा असतो. त्यांच्या डोक्यावर टक्कल पडलेले असते. त्यावरून सतत हात फिरवण्याची त्यांची सवय असते. इतिहास हा विषय शिकवत असताना ते म्हणायचे की, 'डॉ. आंबेडकर हे कापड्यांचे फार शौकीन होते. चांगले चांगले सूट वापरत असत. म्हणून मी सुद्धा सुटा-बुटात येतो, असे नाही बरं का ? शिक्षकांची कपडे नीटनेटकी असावीत म्हणून मी घालतो', मधू आपल्या गावातील सरु या मुलीवर बलात्कार झाला आहे. त्यावर काही तरी मार्ग सुचवितील म्हणून विचारतो. सरांनी अशावेळी 'खेड्यातून शहराकडे चला' अशा बोलण्यातून संदेशच दिला आहे. यातून त्यांची आपल्या समाजाकडे बघण्याची दूरदृष्टी पहावयास मिळते. अशा प्रकारचे मार्गदर्शन कासार सर करताना दिसतात. काकतकर हा दलित समाजातील पुढारी होता. तो मधुला निरोप देऊन बोलावून घेऊन म्हणतो की, 'डॉ. आंबेडकरांनी मातंग समाजाला बोलवून आपल्या

कार्यात येण्यासाठी टाहो फोडून बोलावले तरी ही तो शेवटपर्यंत आला नाही. त्यांना बाबासाहेब कळले नव्हते, असा मधुला टोला मारतो.

आपल्याच समाजातील लोकांना अमूक सुधारणा करतो, तमूक सुधारणा करतो असे सांगून काकतकर लुबाडत असतो. कुणाच्या मुलींची लग्ने लावतो, कुणाला नोकरी लावतो अशा अनेक थापा मारुन समाजाला लुबाडीत असतो. वसतिगृह चालविण्याची त्याल संधी मिळाली असताना मुलाच्या मिटींगमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून विद्यार्थ्यांनी अखंड ज्ञान साधना चालू ठेवावी असे सांगत असतो. या पात्रातून दलित समाजातील अपप्रवृत्तींचे दर्शन लेखकाने करून दिले आहे. अशा लोकांना समाजाने कोणतेही स्थान देऊ नये असेच थोडक्यात सांगितले आहे.

बन्सी हा दलित समाजातील तरुण एस.एस.सी.पर्यंतचे शिक्षण घेऊन नोकरी करीत असतो पण गावकीची म्हणजे जनावरे ओढण्याची कामे तो करीत असतो. याचा मधुला राग येतो. डॉ. आंबेडकरांनी हे नाकारायला सांगितले असतानाही अशी कामे करतोस म्हणून उपदेशाचे डोस पाजत असतो. बन्सीच्या वर्णनातून लेखकाने देखिल दलितसमाजातील काही शिक्षण घेऊन व्यक्ती सुधारलेल्या नाहीत. अनेकजन परंपरावादी दृष्टीनेच वागत असल्याचे दाखवून दिले आहे. यातून लेखकाला दलित समाजाने डॉ.आंबेडकरांचे विचार स्वीकारुन जगायला पाहिजे असेच सांगावयाचे आहे असे वाटते.

'आग' कादंबरीत स्त्रियांची पात्रे आहेत. ती आपल्या योग्य त्यावेळी भूमिका घेऊन साकारताना दिसतात. चंदू वारके याची आई सुस्वभावी प्रेमळ, आपुलकीची दिसते. चंदूची आई जेवण वाढत असताना मधुला आपल्या आईची आठवण होते व तो आपल्याला आई नसल्याची खंत व्यक्त करतो. मधुला पाटील मारणार आहे हे समजल्यावर चंदू व चंदूची आई मधुला निरोप देण्यासाठी जातात. त्याला सर्व कांही माहिती देऊन आपल्या घरी घेऊन येतात. त्याला मारतील या भीतीने मधुला एका

खोलीत कुलूप लावून ठेवतात. हे जे मधूसाठी ते करतात त्यातून वारके यांच्यामधील प्रेमाचे स्वरुप दिसून येते. वारके देखील बाराबलुतेदारांपैकीच एक आहेत. मधूसारख्या शिकलेल्या मुलाला पाटील मारतील म्हणून त्याचे संरक्षण करताना दिसतात. दलितांच्या विषयी काही लोकांना जिव्हाळा वाटतो हेच लेखकाने या दोन्ही पात्राच्या वर्तनातून दाखविले आहे.

मधूचे वडील संभा हा दलित समाजातील आहे. त्यामुळेच त्याच्या वाट्याला गरिबी, दारिद्रय आले आहे. स्वत:ची जमीन नाही म्हणून तो दुसऱ्याची जनावरे राखण्यासाठी जात असतो. त्याच्यावर उदरनिर्वाह करून पोट भागवत असतो. संभा बायको वारली तरी पण दुसरे लग्न करीत नाही. तो मधुला कुठेतरी नोकरी करून लग्न करून घे असे सांगतो. कारण स्वत:च्या भाकरीचा तरी प्रश्न मिटेल असे त्याला वाटत असते. प्रस्तुत कादंबरीमध्ये संभा हे एक परंपरावादी पात्र दाखविले आहे.

सित्याबापूने मुलगा आजारी असताना चार कणसं घेतली म्हणून माली पाटलाच्या मुलाने सित्याबापूला मारले. तसेच पोरीच्या लग्नात उचल घेतली त्यावर पाटील व्याज लावतो. त्यातून सवर्ण लोक दलित माणसांना कसे राबवून घेतात. त्याला आपल्या दबावाखाली कसे ठेवतात हे दाखवून दिले आहे. सरपंच व गावचा पाटील ही गावची प्रमुख मंडळी म्हणून सर्वांच्याकडे समानतेच्या दृष्टीने पाहायला हवे होते. पण ते देखील वक्र नजरेने पाहताना दिसतात. म्हणून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी सरपंचाकडे अर्ज दिला जातो. याचा सवर्ण लोकांना राग येतो. त्या अर्जातील अर्थाचा बेअर्थ करून दलितांच्यावर अन्याय करतात. कोणत्याही दलित व्यक्तीला शेतात कामाला घ्यायचे नाही. दलितांना वेशीच्या आत घ्यायचे नाही. दुकानचा बाजारही द्यावयाचा नाही अशी दलित समाजाची कोंडी सवर्ण लोक करताना दिसतात. यातून लेखकाने दलित लोकांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे वर्णन केले आहे. 'आग' कादंबरीचा

नायक मधू अनेक प्रश्नांना तोंड देत असतो. जी करण्याची इच्छा बाळगून आला होता ती न करताच उमापूरला निघून जातो. असे कथासूत्र लेखकाने मांडले आहे.

मधू, त्याचा बाप संभा, मधून न पाहिलेली तरी मनात आठवणींचा काल्पनिक दरवळ ठेऊन गेलेली आई, मित्र वसंत व मनोहर चवरे,दलित समाजातील माणसं, गावकरी, जिच्याविषयी मनात प्रीतीचा कोवळा अंकुर लसलसत राहिला आहे अशी सरु, काकतकर हा स्थानिक पुढारी आणि महारवाडा यांच्या परिसरातील उद्‌ध्वस्त जीवन यांचे तपशीलवार चित्रण 'आग' कादंबरीतून चित्रित झालेले पाहावयास मिळते.

**'आग' कादंबरीचे विशेष :**

बाबुराव गायकवाड यांची 'आग' कादंबरी दलित साहित्यातील दलित कादंबरी म्हणून वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'झळ' या कादंबरीनंतर पंधरा वर्षानी ही कादंबरी प्रकाशित झाली. दोन कादंबऱ्यात एवढे अंतर असूनही तत्कालीन काळाचे भान ठेऊन डोळसपणे मांडणी केल्याचे दिसून येते. 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ' हा कादंबरीचा मुख्य विषय असून त्यामध्ये घडलेल्या घडामोडीचे वर्णन कादंबरीद्वारे लेखकाने करून दाखविले आहे.

'आग' या कादंबरीचा नायक मधूच्या हालचालीतून ही कादंबरी पुढे सरकत असताना दिसते. उमापूरला शिक्षणासाठी गेलेला मधू नवीन विचारांचे वारे घेऊन धावडीला येतो. आपल्या गावातील दलित समाजातील तिन्ही वाड्यात जमीन का नाही ? हा समाज असा दरिद्री कसा राहिला इतर माणसांनी हातपाय न हालविताही पिढ्यान-पिढ्या जगण्याची सोय करून कशी काय ठेवली ? असे अनेक प्रश्न मधूच्या डोक्यात घोंगावत असतात.

मधूचे वडील संभा हा सवर्ण लोकांची जनावरे राखून आपला उदरनिर्वाह चालवित, लहानशा खोपटात राहत असतो. संभूला दुसऱ्याची चाकरी करणे का भाग पडलेयाचे मूळ त्याच्या वाट्याला आलेली जात हीच दरिद्री जीवनाला कारणीभूत आहे असे वाटते. अर्जावर अंगठा केला असतानाही पाटलाच्या भीतीपोटी स्वत:चा अंगठा नाही असे खोटे सांगतो. याचे कारण त्याच्यात असणारा शिक्षणाचा अभाव. यातून संभाचा अडाणीपणा किती धोका पत्करलेला दिसतो हे पहावयास मिळते. संभा मधुला म्हणतो की, ''इळा न् माळ त्या पोरटीच्या घरी काय गढुडं असतंय रं ? म्हारडे पोरगी तुह्या गळ्यात बांधायचे ! तिथं जात-येत जाऊ नगंस !''[६] यातून दलितां अंतर्गत जातियतेचे दर्शन पहावयास मिळते. याच्याकडे ही लेखकाने प्रकाश टाकला आहे.

दलित साहित्यामध्ये दलित व दलितेतर यांच्या संदर्भात अनेक ठिकाणी चित्रण आलेले आहे. तसे या कादंबरीत ही आले आहे. 'बारा महिने पुजापाठ करून दक्षिणा उकळणारा ब्राह्मण म्हणजे खंडणी वसूल करणारा जुलमी बादशाहाच.' तो स्वत:ला उच्च समजणारा व इतरांशी वागताना अधर्माने वागू लागला व इतरांना नकली धर्म सांगू लागला. भारतीय समाजव्यवस्थेची उतरंड कुणा बिनबुडाच्या मनूने लिहिलेली आहे. असे वर्णन करून लेखकाने भारतीय देशातील वर्णव्यवस्था दाखवून दिली आहे. मधू उमापूर कॉलेजला असताना नामांतर चळवळीने डोके वर काढले होते. त्यामुळे खेडीपाडी दंगल होऊन घरेदारे जाळल्याच्या माणसांचे मुडदे पाडण्याच्या बातम्या समजत होत्या. शहरात इतकी दहशत, तर खेडोपाडी लोकांचे, विशेषत: दलितांचे काय हाल होत असतील ? या विचाराने मधूचे डोके ग्रासून गेले होते. सवर्ण व दलित एकमेकाविरूद्ध जिद्दीने कंबरा कसून लढत होते. प्रत्येकजण 'अस्मिता' जपण्याचा प्रयत्न करीत होता आणि त्या अस्मितेपोटी कित्येक माणसांचा बळी जात होता. सगळा मराठवाडा जणू

रणांगण बनला होता. हे वातावरण मधूने आपल्या डोळ्याने बघितलेले आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या वेळेचे वर्णन लेखकाने असे केले आहे.

सवर्ण व दलित जिद्दीने लढत होते. अशा प्रक्षुब्ध परिस्थितीत मधुला आधार मिळाला तो म्हणजे सवर्ण दौंडसरांचा. त्यांच्या वागण्यामध्ये सवर्णांचा ताठा दिसत नव्हता. त्यांच्या आचारात व विचारात त्याला ब्राह्मणांचा मागमूसही जाणवला नाही. दंगलीच्यावेळी दौडसरांनी मधुला आपल्या घरात आसरा दिला. त्यांच्याशी झालेल्या संभाषणातून सवर्ण आणि दलित यांचा परस्पर विरोधी गैरसमज राजकर्त्यांचा आपमतलबीपा आंबेडकरांचा लढा विचार हक्कासाठी व न्यायासाठी कसा होता. लोक सुशिक्षित झाले तरी अजूनही स्वतंत्र विचार करू शकत नाहीत. तर ते नेत्यांच्यामागे मेंढरासारखे चालतात. भारतीय जनतेच्या जातियवादी संघर्षाचे मूळ यातच आहे. असे दौंड सरांच्या बालण्यातून दाखविले आहे.

काकतकरांसारखे पात्र रंगवून लेखकाने दलित समाजातील पुढाऱ्यांचे प्रतिनिधीत्व करताना दाखविले आहे. काकतकर क्रांतीच्या कचेरीत कारकून म्हणून काम करतो. गावाकडील काही तरी सुधारणा करतो असे सांगून आपल्या दलित समाजातील लोकांना लुबाडत असतो. याप्रकारचे अनेक उद्योग तो करीत असतो. गोडबोलून दिशाभूल करणे, थापा मारणे हा त्याचा स्वभाव. दलित समाजातील व्यक्तीच जर दलित समाजाची फसवणूक करीत असेल, तर यासारखी खेदजनक बाब कोणती ? हा लेखकाने प्रश्न आपल्यापुढे उभा केला आहे. डॉ. बाबासाहेबांचे नाव घेऊन समाजकार्य करण्याच्या नावाखाली समाजालाच लुबाडणाऱ्या काकतकरांसारखी माणसे थोडी नाहीत. लेखकाने काकतकर या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून दलित समाजातील वास्तव चित्रण केले आहे. दलित समाजातील अशी काकतकरासारखी व्यक्ती म्हणजे समाजातील कीड आहे. असे बाबुराव गायकवाड यांनी दाखविले आहे.

दलितांना शासनाकडून मिळणाऱ्या सवलतीमुळे सवर्ण चीडत असतात. दलितांना मिळणाऱ्या सवलतीमुळे सवर्ण आतल्या आत धुमसतो. राजकारणी लोक मते मिळविण्यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या वापरुन आंदोलने, दंगली, मोर्चे उभे करतात. पण त्यातून सामान्य माणसांचा बळी जात असतो. हे भयानक वास्तव लेखकाने मधूच्या चिंतनातून प्रकट केले आहे. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून आंदोलन सुरु हाते. त्या आंदोलन काळातील खेड्यातील दलितांची आणि दलितेतरांची मानसिकता, त्यांचे झालेले हाल, मारहाण, दलित आणि सवर्ण यांच्यातील संघर्ष बाबुराव गायकवाड यांनी आपल्या कादंबरीतून चित्रित केले आहे.

बन्सीसारखी माणसं शिक्षण घेऊन ही गावकीची कामे नाकारत नाहीत. याचा मधुला राग व चीड येत असते. याकडे लेखकाने प्रकाश टाकला आहे. माणसाच्या जगण्यात भूकेचा प्रश्न महत्त्वाचा असतो. भूकेचा प्रश्न हा विश्वव्यापक आहे. दलित व्यक्तींना हा भूकेचा प्रश्न पडतो. दुष्काळग्रस्त धावडीतआंब्याच्या कोयी भाजून खाणारा मधू व मृत जनावरांच्या मांसखांडावर तुटून पडणाऱ्या माणसांचे चित्रण लेखक करतो. सवर्ण मुले शाळेत 'डबा' नेतात. या सवर्णांना स्पर्श करून भूकेसाठी विटाळ करून त्यांची भाकरी वाटवणारी ही लहान मुले दिसतात. या मुलांच्यात आलेली फसवेगिरी, तयार झालेले गुंडत्व याला आपल्या समाजातील जातीव्यवस्था कारणीभूत आहे असे वाटते.

सरु, निशा, सरुची आई व चंपा या 'आग' कांदबरीतील महत्त्वाच्या स्त्री-व्यक्तिरेखा आहेत. सरु सारख्या सुंदर मुलीवर चंदा पाटलासारखी व्यक्ती अन्याय करते. त्यामुळे ती जीवनातून उठली जाते, बरबाद होते. सरुच्या घरची गरिबी व दलितपणामुळेच तिला हे दु:ख सहन करावे लागते. सरुची आई काकतकरवर विश्वास ठेवते. अज्ञानापायी त्याचाच शब्द खरा मानणारी सरुची आई, सरुला पाटलाच्या

तावडीत देणारी म्हातारीही दलित समाजाची मारेकरी आहे, असे मधुला वाटत असते. राजकारणाचे डावपेच ओळखून सुशिक्षित दलितांना योग्य मार्गदर्शन करणारे कासारसर आपल्या निराळ्या व्यक्तीमत्त्वाने समोर येताना दिसतात.

दलित आणि दलितेत्तर समाज यांच्यामध्ये परस्पर द्वेषाची भावना असतेच तशी ती दलित समाजाच्या विविध जाती-जातीमध्ये तितकीच उग्र स्वरुपात पहावयास मिळते. हे या कादंबरीत बाबुराव गायकवाड यांनी मांडले आहे. 'आड महाराचा म्हणून कोणताच मांग अजून पाणी पीत नव्हता.' महार, मांग व चांभार यांच्यातही एकमेकांच्या प्रगती, अप्रगतीवरून सुप्त तेढ निर्माण होत असते असे पहावयास मिळते. पाचशे घरांच्या धावडीतही दलितांचे असे सवतेसुभे असलेले या कादंबरीत पाहावयास मिळते.

या कादंबरीमध्ये दोन पिढीचा संघर्ष दाखविला आहे. जुनी पिढी लाचारीचं जीवन जगत होती, तर तरुण पिढी लाचारी नाकारत होती. मधू आणि त्याचा बाप संभू, सरु आणि तिची आई, वसंता आणि त्याची आई, तसेच पाटील, सरपंच आणि मधू व त्याचे मित्र याचे सहज वर्णन बाबुराव गायकवाड करतात.

दलित जीवनातील त्यातही दलित मांग जातीच्या सामाजिक जीवनाचा दु:खद अनुभव मांडताना त्यांच्या जगण्याची जीवनपद्धती आणि त्या समाजाची मानसिकता सहजपणे 'आग' या कादंबरीत चित्रित झाली आहे असे वाटते. आंबेडकरांचे विचार आपण आपल्या माणसांना ऐकवावे, म्हणून मधू उमापूरहून येताना 'भीमपत्रिका' सोबत आणतो. परंतु ती वाटेतच विसरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार असाच हा समाज एक दिवस विसरुन तर जाणार नाही ना ? असे 'भीमपत्रिका' विसरणे यावरून सूचित केल्यासारखे वाटते.

सित्याबापू स्वाभिमानी असणारा अवहेलना होताच चिडून उठतो. त्याला 'चोर' म्हणून डिवचणारा पाटील त्याला चोरी करण्यास भाग पाडतो. असा सित्याबापू सवर्ण

लोक मारायला आल्यानंतर शिशाचा गोळा फिरवून त्यांना मातर सुटतो. यातून त्याचे विद्रोही रुप पहावयास मिळते. महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' असा दिलेला संदेश आणि कासार 'खेड्यातून शहराकडे चला' असे सुचवतात. यातून दोन्ही विचारातील अंतर दिसून येते. यामधून ग्रामीण भागातील जातियता शहरी भागात दिसून येत नाही. म्हणून कासारसर असा संदेश देताना दिसतात.

निशा एक काळीसावळी, काहीशी नखरेल मुलगी चंपाची आवृत्तीच असते. मधुला ती आधुनिक बुद्ध म्हणून चिडविताना दिसते. तिच्यावरून मधुला झालेली डावरेकडून मारहाण. येथे विश्वासघात केल्याचे पहावयास मिळते. काकतकर सरुला एका बाईला धंद्यासाठी विकतो. लेखकाने सरु व मधू यांचे प्रेम फक्त मानसिक पातळीवर शब्दातून वर्णन केले आहे. सरु जितकी अगतिक तितकाच या घटनेने कोलमडणारा मधूही अगतिक आहे. मधूचे तिच्याबरोबर सुखी संसार करण्याचे स्वप्न धुळीला मिळते. त्यामुळे मधू सुन्न होतो. स्वत:वरचा अन्याय दूर करण्यासाठी झगडणारा मधू पाटलाचा रागही ओढवून घेतो. त्यामुळे पाटील त्याला 'वेशीबाहेर' काढतो. दलित समाज तसा दुबळाच राहिला. पिण्याच्या पाण्याकरीता दिलेल्या अर्जाचा राग येऊन सरपंच, पाटील यांनी दलित समाजाला गावच्या बाहेर काढले. दलितांना शेतात काम करण्याचे बंधन घालतात. दुकानातील बाजार देण्याचे थांबवितात. यावरून दलितावरील होणाऱ्या छळ, त्यांना दिलेला त्रास पहावयास मिळतो. सवर्ण व्यक्ती आपल्या जवळ असणाऱ्या अधिकाराचा वापर कसा वाईट हेतूने करतात हे दाखविले आहे.

मधूच्या माध्यमातून दलित चळवळी विषयी जे विचार लेखकाने मांडले आहेत त्याची दलित नेतृत्वाने दखल घ्यायला हवी. दलित वर्गातील विविध जाती उपजातीमधील वाद आणि संघर्ष यातच दलितामधील दुहीची बीजे आहेत. ही चळवळ एकारलेली राहिलेली आहे. असे न होता ती सर्व समावेश व्हावी असे वाटते. दलितांच्या मनात

अखंड धुमसत राहिलेला राग मोजक्या शब्दात चित्रित केल्यामुळे 'आग' कादंबरी वाचनीयतेबरोबर विचार परिवर्तन करणारी ठरलेली आहे.

'आग' या कादंबरीचा वेगळा विशेष म्हणजे दलित समाजातील अन् तेही ग्रामीण भागातील दलित तरुणांचे शालेय जीवनापासून ते आंबेडकरांच्या प्रेरणा घेऊन महाविद्यालयातून बाहेर पडलेल्या तरुणापर्यंतचे विविध पातळीवर चित्रण 'मधू' या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून केलेले आहे असे वाटले. आंबेडकरांचा वैचारिक वसा घेऊन खेड्यातील आपल्या पारंपरिक समाजात परिवर्तन करू इच्छितो. पण ते शक्य होत नाही. मधूच्या विकासातच दलित समाजातील परिवर्तन बाबुराव गायकवाड यांनी टिपले आहे असे वाटते.

गावकऱ्यांची एकमेकांविषयी ईर्शा, द्वेष, स्वार्थ व आगलावेपणा अशा विविध भावभावनांच्या ज्वाला प्रस्तुत कादंबरीत प्रकर्षाने जाणवतात. ग्रामीण जीवनाचे विविध दृष्टीने केलेले वर्णन लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचे द्योतक आहे. दलितांच्या जीवनाशी एकरुप झालेला ग्रामीण जीवनक्रम मानवी प्रकृतीचं मार्मिक दर्शन व भेदक समाज जीवनाचं विदारक दर्शन लेखकाने समर्थपणाने रंगविलेले आहे.

या कादंबरीतील भाषा अस्सल देशी मातीतील असून तिचे मराठीपण गायकवाड यांनी जीवाभावाने जपलेले आहे. भाषेचा एक नमुना म्हणजे 'कोंबड्या डालग्यात जाऊन बसतात, तसे प्रवासी बसमध्ये जाऊन बसले. विझत चाललेल्या चिमणीबद्दल ते लिहितात, 'जीव जाणाऱ्या माणसाप्रमाणे ती आचके देत होती.' या भाषेवरून गायकवाड ह्यांच्या भाषेचे स्वरुप दिसून येते. दलित कादंबरीच्या इतिहासात बाबुराव गायकवाड यांची 'आग' ही सामाजिक ज्वलंत प्रश्नावर लिहिलेली कादंबरी आशय आणि अभिव्यक्तीच्या पातळीवर एक वेगळे असे व्यक्तिमत्त्व घेऊन उभी राहते.'

**समारोप :**

'झळ' ही कादंबरी मातंग समाजातील कुटुंबाच्या वाताहतीची कहाणी आहे. परंतु दलित जीवनातील ताणतणाव दलित मानसिकता याचा वेध कादंबरीच्या आशयविशेषात चित्रित करता आलेला नाही. तर 'आग' कादंबरीचा आशय दलित मानसिकतेचा प्रश्न मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न या अनुषंगाने ग्रामीण भागातील दलित मानसिकतेचा सर्वांगाचा वेध घेता आला नाही. नामांतर प्रश्नाच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील दलित जीवनात घडत असलेले ताणतणाव हेही म्हणावे तितक्या प्रभावीपणे चित्रित झालेले दिसत नाहीत.

-----

# संदर्भग्रंथ


१) 'झळ', बाबुराव गायकवाड, प्रकाशक - सुरेश राऊत, मुंबई, प्रथमावृत्ती, मार्च, १९८०, पृ. क्र.७४.

२) 'झळ', बाबुराव गायकवाड, प्रकाशक - सुरेश राऊत, मुंबई, प्रथमावृत्ती, मार्च, १९८०, पृ. क्र.७२, ७३.

३) 'झळ', बाबुराव गायकवाड, प्रकाशक - सुरेश राऊत, मुंबई, प्रथमावृत्ती, मार्च, १९८०, पृ. क्र.७३.

४) 'आग', बाबुराव गायकवाड, मंजुल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९६, पृ.क्र. ९३.

५) 'आग', बाबुराव गायकवाड, मंजुल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९६, पृ.क्र. ९३.

६) 'आग', बाबुराव गायकवाड, मंजुल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९६, पृ.क्र. ७५.

७) साहित्य साधना, बाबुराव गायकवाड यांचे समग्र साहित्य : एक परिचय, अनुबंध प्रकाशन, अकोला, आवृत्ती पहिली, २००४.

८) दलित साहित्य : उद्‌गम आणि विकास, योगेंद्र मेश्राम, श्रीगणेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९८.


-----